सातारा जिल्हयातील नागरी सहकारी बँकांचा चिकित्सक अभ्यास (२००५-२०१५)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानव्यविद्या शाखेअंतर्गत

अर्थशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवीसाठीच्या शोध प्रबंधाचा

सारांश आराखडा

संशोधक

प्रा. प्रकाश नामदेव शिंदे

अर्थशास्त्र विभाग,

राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय,

औंध, जि. सातारा (महाराष्ट्र)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. शाहूराज एस. मुळे

अर्थशास्त्र विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक,

कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय,

बाभळगांव, जि. लातूर (महाराष्ट्र)

डिसेंबर, २०१७

सातारा जिल्हयातील नागरी सहकारी बँकांचा चिकित्सक अभ्यास (२००५-२०१५)

प्रस्तावना :-

भारत हा प्रामुख्याने कृषीप्रधान देश असून या देशामध्ये खेड्यामध्ये राहणारी लोकसंख्या मोठ्या प्रमाणात होती. या देशातील बहुसंख्ये लोकांचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे. शेती मुख्य व्यवसाय असला, तरी शेतीचे आकारमान हे अतिशय लहान आहे. यातील बहुसंख्ये शेतकरी अल्पभुधारक आहेत, तसेच शेती ही बहुसंख्येने कोरडवाहू आहे. शेतीचा व पर्यायाने ग्रामीण जनतेचा सर्वांगीण विकास घडवून आणावयाचा असेल, तर यासाठी पाश्चिमात्य देशाप्रमाणे भारतातही सहकारी चळवळ रुजविणे आवश्यक असल्याचा विचार प्रवाह निर्माण झाला. भारतात 19 व्या शतकाच्या शेवटी शेतकऱ्यांची कर्जबाजारीपणाची समस्या दिवसेंदिवस बिकट होत होती. ही समस्या कमी करण्यासाठी 1883 मध्ये जमिन सुधारणा कायदा आणि 1884 मध्ये शेतकऱ्यांसाठी कर्जविषयक कायदा पास करण्यात आला, परंतू यामधून देखील शेतकऱ्यांची समस्या कमी झाली नाही. भारतातील शेतकऱ्यांची सावकारी कर्जातून मुक्ती करण्यासाठी ब्रिटीश सरकारने युरोपातील सहकारी चळवळीचा अभ्यास करुन सर एडवर्ड लॉ समितीच्या शिफारशीच्या माध्यमातून 1904 मध्ये पहिला सहकारी पतसंस्था कायदा संमत करण्यात आला. या कायद्यानुसार फक्त सहकारी पतसंस्थाच नोंदविता येत होत्या. या कायद्यामध्ये दुरुस्ती करुन 1912 मध्ये केंद्र सरकारने सहकारी संस्थांचा कायदा संमत केला. 1919 मध्ये सहकार विषय राज्याकडे आल्यामुळे मुंबई राज्य सहकारी संस्थांचा कायदा 1925 मध्ये मंजूर केला.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतामध्ये भाषेवार प्रांत रचना झाली. यानुसार 1 मे 1960 रोजी स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती करण्यात आली. याचवेळी 1960

मध्ये महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा अंमलात आला. महाराष्ट्रामध्ये सहकाराचा विकास, प्रचार आणि याला लोकचळवळीचे स्वरुप देण्यासाठी तत्कालीन महाराष्ट्रामध्ये खंबीर नेतृत्त्व उदयास आले. यांनीच संपूर्ण भारतामध्ये आजही नावारुपास असलेली सहकार चळवळ वटवृक्षामध्ये रुपांतरीत केली आहे. यामध्ये महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतरावजी चव्हाण, धनंजयराव गाडगीळ, पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, वसंतराव दादा पाटील, तात्यासाहेब कोरे, राजारामबाबू पाटील, रत्नाप्पा कुंभार, शरद पवार यांचा अग्रक्रमाने उल्लेख करावा लागेल.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर सद्यस्थितीत विविध प्रकारच्या जवळपास 58 सहकारी संस्था महाराष्ट्रामध्ये कार्यरत आहेत. त्यापैकीच नागरी सहकारी बँका हा एक महत्त्वाचा अर्थपुरवठा करणारा घटक शहरी भागात कार्यरत आहे. शरीरातील रक्तवाहीनीप्रमाणे शहरी व निमशहरी भागत विविध गरजू घटकांना मदत करण्यासाठी नागरी बँकांचा उदय झाला आहे

भारतामध्ये बँक व्यवसायाची रचना पाहिली तर यामध्ये प्रामुख्याने मध्यवर्ती बँका, व्यापारी बँका, औद्योगिक बँक, विनिमय बँका, बचत बँका, शेतकी बँका, ग्रामीण बँका व सहकारी बँका यांचा समावेश होतो.

नागरी सहकारी बँका :-

जर्मनीमध्ये 1850 मध्ये हार्मन शुल्झे यांनी पहिली नागरी बँक सुरु केली. याच काळामध्ये इटालीमध्ये लईगी लुझाटी यांनी नागरी पतसंस्था स्थापन केली. ही जागतिक स्तरावरील नागरी बँकांची मुर्हूतमेढ मानली जाते.

याच पद्धतीवर भारतामध्ये महाराष्ट्रीयन श्री विठ्ठल लक्ष्मण कवठेकर यांच्या नेतृत्वाखाली बडोदा येथे 5 फेब्रुवारी 1889 मध्ये अन्योन्य सहाय्यकारी मंडळ नावाची नागरी सहकारी पतसंस्था स्थापन केली. याच पतसंस्थेला 1904 च्या कायद्यानुसार कायदेशीर दर्जा मिळाल्यामुळे भारतातील पहिली नागरी बँक म्हणून याचा उल्लेख केला जातो. सद्याच्या महाराष्ट्र प्रांतात 1906 मध्ये दि.शामराव

विठ्ठल सहकारी बँक लि. ही मुंबई येथे स्थापन करण्यात आलेली पहिली नागरी बँक आहे.

सद्याच्या नागरी बँकामध्ये नागरी सहकारी बँका, पगारदार कर्मचाऱ्यांच्या पतसंस्था, औद्योगिक सहकारी पतसंस्था यांचा समावेश होतो.

2005 पर्यंत भारतात 1872 नागरी सहकारी बँका होत्या. तर महाराष्ट्रामध्ये 2005 पर्यंत 637 नागरी सहकारी बँका होत्या.

आलिकडच्या काळामध्ये महाराष्ट्र राज्यासह देशामध्ये सर्वच राज्यात शहरी लोकसंख्या ही ग्रामीण भागातील लोकांच्या स्थलांतरामुळे वाढत आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे शहरात औद्योगिक कारखान्यात रोजगार संधी, शिक्षणाचे प्रमाण, दळणवळणाची साधने, कामाची तुलनेने हामी, शहरात वाढत्या पायाभूत सुविधा, ग्रामीण भागातील शेतीचे मागासलेपण, पावसावर आधारलेली लहरी शेती, इत्यादीमुळे यापूर्वी शहरात कार्यरत असलेल्या इतर बँकावर मोठ्या प्रमाणात ताण येत आहे. यावर उपाययोजना म्हणून शासनाने व विशेषत: RBI ने पुढाकार घेऊन अलीकडच्या काळात शहरी व निमशहरी भागात बँकांच्या विकासाला प्राधान्य दिल्यामुळे आज वाढत्या शहरीकरणाच्या अपेक्षा समर्थपणे पेलण्यास नागरी सहकारी बँका यशस्वी ठरत आहेत.

म्हणूनच मी. नागरी सहकारी बँकांचे आर्थिक व सामाजिक विकासातील योगदान यासंदर्भात महाराष्ट्र राज्यतील अतिशय ऐतिहासीक व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पद्स्पर्शाने पावन झालेला महाराष्ट्राची विद्युतवाहिनी म्हणून ओळखला जाणारा एक प्रमुख राजकीय जिल्हा. ज्या जिल्ह्याने देशाचे उपपंतप्रधान व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतरावजी चव्हाण, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. पृथ्वीराज चव्हाण, अभयसिंह राजे भोसले, मा.बाळासाहेब देसाई, मा. यशवंतराव मोहिते, मा.प्रतापराव भोसले , मा.श्रीमंत मालोजीराजे निंबाळकर, मा.पी.डी. पाटील, मा. भिक्कू दाजी भिल्लारे इत्यादींचा कार्यभुमी असलेला सातारा जिल्हा अभ्यासासाठी निवडलेला आहे व **"सातारा जिल्ह्यातील नागरी**

सहकारी बँकांचा चिकित्सक अभ्यास (2005-2015)" या विषयावर यापूर्वी संशोधन झालेले नसल्यामुळे मी हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

सद्यस्थितीत सातारा जिल्ह्यामध्ये प्रमुख 11 तालुके असून ज्या लहान मोठया विविध नागरी सहकारी बँका सातारा जिल्ह्यात कार्यरत आहेत. त्यांच्या शाखांची, कर्मचाऱ्यांची, ठेवींची, बचत जमा ठेवी विषयक उत्पन्न तसचे विविध क्षेत्रात कर्जवाटपांची स्थिती कशी आहे हे अभ्यासण्यासाठी हा विषय निवडण्यात आलेला आहे. यासाठी सातारा जिल्हयामध्ये एकूण बॅंका 27 यापैकी नागरी सहकारी बँकांची संख्या 06 असून या नागरी सहकारी बँकांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

1) दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. कराड (62 शाखा)
2) महाबळेश्वर अर्बन सहकारी बँक लि. महाबळेश्वर (02 शाखा)
3) जनता अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. वाई (07 शाखा)
4) दि वाई अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. वाई (26 शाखा)
5) मायनी अर्बन सहक ारी बँक लि. मायनी (07 शाखा)
6) दि. पाटण अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. पाटण (08 शाखा)

वरील नागरी सहकारी बँकांमधून प्रत्येकी 20 टक्के लाभार्थी अभ्यासासाठी निवडले जाणार आहेत.

विषयाचे महत्त्व व निवड :-

नागरी सहकारी बँका या कृषी सहकारी बँकांप्रमाणेच जुन्या आहेत. कृषी सहकारी बँक स्थापनेमागचा मुख्य उद्देश हा ग्रामीण भागातील शेतकऱ्याला सावकाराच्या कचाट्यातून मुक्त करुन स्वयंपूर्ण बनवणे हा होता. तर, नागरी सहकारी बँकांच्या स्थापनेचा मुख्य हेतू नागरी भागातील कमी उत्पन्न, दुर्बल घटकांच्या कर्जाच्या गरजा भागवून त्यांना सावकाराच्या कचाट्यातून मुक्त करणे हा आहे. नागरी सहकारी बँकांचे महत्त्व यासाठी आहे की, या बँका दुर्बल घटकांना उत्पादक कारणासाठी कर्ज देतात. जसे बांधकाम, घर दुरुस्ती, शिक्षण,

व्यवसाय, लघु उद्योग, इत्यादी. तसेच, नागरी सहकारी बँका सामाजिक जाण ठेवून लग्न समारंभ, मृत्यू कार्य, धार्मिक कार्य इत्यादी कार्यासाठी देखील कर्ज पुरवठा करतात. थोडक्यात, नागरी सहकारी बँका ग्राहकांच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षदृष्ट्या कार्य करतात. परंतू सातारा जिल्ह्यातील नागरी सहकारी बँका ग्राहकांच्या सभासदाच्या आर्थिक व सामाजिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान देत आहे किंवा नाही ? सभासदांना दिल्या जाणाऱ्या कर्जाचा योग्य वापर होतो किंवा नाही? दिलेल्या कर्जातून उद्योजक प्रगतशील बनत आहे का? दुर्बल घटकांना कर्ज दिले जाते का? दुर्बल घटकांचा नागरी सहकारी बँकांमुळे विकास होत आहे का ? इत्यादी प्रश्नाच्या महत्त्वामुळे प्रस्तुत विषयाची अभ्यासासाठी निवड केली आहे.

विषयाचे समस्यसूत्रण :-

एका बाजूने सातारा जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांचे आर्थिक व सामाजिक विकासातील योगदान अभ्यासताना दुसऱ्या बाजूने विषयातील समस्या अभ्यासणे महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे सातारा जिल्ह्यातील नागरी सहकारी बँका व्यवस्थितरित्या कार्य करतात का ? नागरी सहकारी बँकांच्या समस्या कोणत्या आहेत ? नागरी सहकारी बँकांतील तंत्रज्ञान अद्ययावत आहे का ? नागरी सहकारी बँका ग्राहकांना/सभासदांना योग्य सेवा देतात का ? ग्राहकांच्या/सभासदांच्या बँकेच्या सेवे संदर्भात काही तक्रारी आहेत का? ग्राहकांना/सभासदांना कर्ज काढताना कोणकोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते? अशा समस्याधिष्ठित प्रश्नांच्या अध्ययनाकरिता संशोधन विषयाचे अध्ययन महत्त्वपूर्ण आहे.

संशोधनाची उद्दिष्टये :-

प्रस्तुत विषयाचे अध्ययन खालील उद्दिष्टांच्या सहाय्याने पूर्ण केले जाणार आहे.

1) सातारा जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांचे स्वरुप व कार्य यांचा अभ्यास करणार आहे.

2) जिल्हयातील नागरी सहकारी बँकांच्या उत्पन्नविषयक स्थितीचा अभ्यास करणार आहे.

3) जिल्हयातील नागरी सहकारी बँकांच्या कर्जविषयक स्थितीचा अभ्यास करणार आहे.

4) नागरी सहकारी बँकांच्या बचत व गुंतवणूकीचा अभ्यास करणार आहे.

5) जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकाच्या समस्यांचा अभ्यास करणे.

6) जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांनी सुरु केलेल्या विविध योजनांचा अभ्यास करणार आहे.

7) नागरी सहकारी बँकांच्या बाबतीत सरकारच्या ध्येय आणि धोरणांचा अभ्यास करणार आहे.

8) जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांच्या विकासासाठी शिफारशी सूचविणे.

संशोधनाची गृहितके :-

प्रस्तुत विषयाच्या अध्ययनाकरिता खालील गृहीत धरली होती.

1) सातारा जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांची जिल्हयाच्या आर्थिक विकासात प्रभावी भूमिका आहे.

2) सातारा जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांच्या योगदानामुळे उद्योगांच्या विक ासात भर पडली आहे.

3) सातारा जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांच्या योगदानामुळे नागरीकांच्या सामाजिक व आर्थिक जीवनमानात सुधारणा होत आहे.

4) सातारा जिल्हयातील नागरी सहकारी बँकांच्या कर्जपुरवठयात वाढ झाली आहे.

5) सातारा जिल्हयातील नागरी सहकारी बँकांच्या बचत आणि गुंतवणकीत वाढ होत आहे.

संशोधन पद्धती :-

"सातारा जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांचा चिकित्सक अभ्यास (2005-2015)" या विषयाच्या संशोधनासाठी अन्वेषणात्मक व विश्लेषणात्मक संशोधन आराखड्याचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधन विषय :-

"सातारा जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांचा चिकित्सक अभ्यास (2005-2015)" हा आहे.

तथ्य संकलन :-

प्रस्तुत विषयाच्या अध्ययनाकरिता प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलनाचा वापर केला आहे.

अ) प्राथमिक स्त्रोत :-

सातारा जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांचे आर्थिक व सामाजिक विकासातील योगदान अभ्यासण्यासाठी अनुसूचीद्वारे माहिती संकलित केली जाणार असून या सर्वांसाठी सर्वेक्षण पद्धतीचा व निरीक्षण पद्धतींचा वापर केला जाणार आहे.

ब) दुय्यम स्त्रोत :-

विषयाचे अध्ययन करण्याकरिता दुय्यम साधनसामुग्रीमध्ये संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, नियतकालिके, शासकीय अहवाल, सहकारविषयक अहवाल, संबंधीत बँकांचे वार्षिक अहवाल वर्तमानपत्रे व संकेतस्थळांचा वापर केला जाणार आहे.

सांख्यिकीय तंत्र :-

उपलब्ध माहितीचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, टक्केवारी, वृध्दीदर, संयुक्त वृध्दीदर व आलेख इत्यादी सांख्यिकीय तंत्रांचा वापर करण्यात येणार आहे.

अ) नमुना निवड :-

नमुना निवड करताना प्रामुख्याने सातारा जिल्ह्यातील एकूण 06 नागरी बँका असून त्यांच्या कार्यक्षेत्रातील 20 टक्के लाभार्थ्यांची निवड केली जाणार आहे

ब) निवड घटक :-

सातारा जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांचे उत्पन्न व कर्ज याबाबतचे निक स विचारात घेऊन त्या अनुषंगाने प्रश्नावली तयार करुन त्याअधारे लाभार्थ्यांच्या मुलाखतीच्या आधारे संबंधीत अध्ययन केले जाणार आहे.

क) नमुना निवड तंत्र :-

सातारा जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांचे आर्थिक व सामाजिक विकासातील योगदान अभ्यासण्यासाठी नागरी सहकारी बँकांची निवड साधी न्यायदृच्छिक (Simple Randomm Sampling) पद्धतीने व लाभार्थ्यांची निवड स्तरीय न्यायदृच्छिक (Stratified Random Sampling) नमुना निवड पद्धतीद्वारे करणार आहे.

विषयाची व्याप्ती व मर्यादा :-

प्रस्तुत संशोधन हे फक्त सातारा जिल्ह्यापुरतेच मर्यादित असून यामध्ये सातारा जिल्ह्यातील 05 नागरी सहकारी बँकांपूरतीच विषयाची मर्यादा आहे. तसेच विषयाची व्याप्ती फक्त सातारा जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांचे आर्थिक व सामाजिक विकासातील योगदान अभ्यासण्यापुरतेच आहे.

प्रकरणाची रुपरेषा :-

प्रस्तुत शोध प्रबंधाची विभागीण एकूण सात प्रकणात केली आहे.

प्रकरण पहिले :

प्रास्ताविक :-

प्रस्तुत प्रकरणात प्रस्ताविक, सहकाराचे महत्त्व, सहकार शब्दाची उत्पत्ती व अर्थ, सहकाराच्या व्याख्या, सहकाराची व्याप्ती, सहकाराचे स्वरुप, आधुनिक सहकारी चळवळ, जागतिक सहकारी चळवळीचा इतिहास, जागतिक सहकारी

चळवळीचे समालोचन, भारतातील सहकारी चळवळीचा इतिहास, स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील सहकारी चळवळ, स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील सहकारी चळवळीचा इतिहास, महाराष्ट्रातील सहकार चळवळ, सातारा जिल्ह्यातील सहकारी चळवळीचा आढावा, विषयाचे महत्त्व, विषयाची उद्दिष्ट्ये, गृहीतके, संशोधन पद्धती व प्रकरणाची रुपरेषा इत्यादी घटकांचा अभ्यास या प्रकरणामध्ये करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे :

संशोधन साहित्याचा आढावा :-

प्रस्तुत प्रकरणामध्ये विषयाच्या संदर्भात विविध शासकीय समित्यांचे अहवाल, यापूर्वी ज्या संशोधक व अभ्यासक यांनी बँकाच्या संदर्भात लिखाण, अभ्यास, सर्वेक्षण व संशोधन केलेले आहे. त्याबाबतची थोडक्यात माहिती, त्यांनी मांडलेली निष्कर्ष इत्यादी प्रमुख संदर्भ साहित्याचा थोडक्यात आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे :

सातारा जिल्हा व जिल्हयातील नागरी सहकारी बँकांचा अभ्यास :-

संबंधीत संशोधन हे सातारा जिल्हयाच्या विशेष संदर्भात असल्यामूळे या जिल्हयाची निर्मिती, जिल्हयाची ऐतिहासिक ओळख, प्रशासकीस व्यवस्था, प्राकृतीक रचना, विभाग, नदया, हवामान व पर्जन्यमान, जमीन, पिक रचना, पशुधन, विजेचा वापर, उद्योग, वाहतूक व दळणवळण, रोजगार, सहकार, शाळा व महाविद्यालय, नगरपरीषदा, पंचायत समित्या, जिल्हयाची लोकसंख्या, जिल्हातील विविध सामाजिक, आर्थिक घडामोडी, शैक्षणिक स्थिती, कृषीविषयक स्थिती, जिल्हयातील जलसिंचन, बँका याबाबतचा थोडक्यात आढावा घेतला जाणार आहे.

तसेच नागरी सहकारी बँकेची व्याख्या, नागरी सहकारी बँकांची आवश्यकता, नागरी सहकारी बँकांची वैशिष्ट्ये, नागरी सहकारी बँकांचे कार्यक्षेत्र,

नागरी सहकारी बँकांचे वर्गीकरण, नागरी सहकारी बँकांची उद्दिष्ट्ये, नागरी सहकारी बँकेचे कार्य, नागरी सहकारी बँकांचे सभासदत्व, नागरी सहकारी बँकेचे व्यवस्थापन, नागरी सहकारी बँकांची भूमिका व महत्त्व, नागरी सहकारी बँकांची ऐतिहासिक पार्श्वभूमी, भारतातील नागरी सहकारी सहकारी बँकांची पार्श्वभूमी, भारतातील नागरी सहकारी बँकांची प्रगती, भारतातील नागरी सहकारी बँकांची सद्यस्थिती, बँकिंग व्यवसायात नागरी सहकारी बँकेचे प्रमाण, राज्यनिहाय नागरी सहकारी बँका, विभागनिहाय नागरी सहकारी बँकांची स्थिती, महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांची प्रगती, महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांची सद्यस्थिती, महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांचे वर्गीकरण, महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांमधील प्रादेशिक असमतोल, भारत व महाराष्ट्राची नागरी सहकारी बँकांसंदर्भात तुलना इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात आला आहे.

प्रकरण चौथे :

नागरी सहकारी बँ का व सरकारची धेय-धोरणे

अलीकडच्या काळामध्ये राष्ट्रीयकृत बँका तसेच जिल्हा मध्यवती बँका आणि इतर सहकारी बँका हया वाढत्या शहरीकरण आणि शहर ातील वाढत्या लोक ांच्या कर्जविषयक स्थितीसाठी अपूऱ्या पडत असल्यामूळे नागरी बँकांची निर्मिती शहरी आणि निमशहरी भागामध्ये करण्यात आलेली आहे. परंतू 1991 च्या नवीन आर्थिक धोरणे आणि शासनाच्या खाजगीकरणाऱ्या धोरणामूळे नागरी बॅकांच्या कार्यपध्दतीवर काय परिणाम झालेला आहे. तसेच शासनाच्या ध्येय धोरणामूळे नागरी बँक ांची स्थिती कशी आहे. इत्यादी प्रमूख बाबींचा अभ्यास या प्रकरणामध्ये करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे :

सातारा जिल्ह्यातील नागरी सहकारी बँक ांची बचत,उत्पन्न व कर्जविषयक स्थिती

प्रस्तुत प्रकरणात अभ्यासासाठी निवडण्यात आलेला बँकांच्याउत्पन्न बचत, व कर्जपुरवठ्याच्या आणि त्यासोबत ठेवी, भागभांडवल, कर्ज, नफा, सभासद संख्या इत्यादी घटकांचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण सहावे :

सातारा जिल्हयातील नागरी सहकारी बँकांच्या विविध योजना व समस्यांचा अभ्यास

प्रस्तुत प्रकरणात सातारा जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांचा विकासावरील परिणाम, योगदान इत्यादी बाबींची चिकित्सकपणे मांडणी करण्यात येणार आहे. तसेच नागरी सहकारी बँकांच्या समस्या, ठेवीदारांच्या आणि कर्जदारांच्या समस्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण सातवे :

निष्कर्ष व शिफारशी :-

प्रस्तुत प्रकरणात विषयाच्या उद्दिष्टांनुसार निष्कर्षाची मांडणी केली आहे. तसेच निष्कर्षाद्वारे समोर आलेल्या समस्या किंवा उणिवांना दूर करण्यासाठी महत्त्वपूर्ण शिफारशी करण्यात येणार आहेत.

संदर्भ :-

1) Sharma R.B. (2001),"Co-operative Sector in India", Economic and Political Weekly, Vol.IXXY, No.1, Sammeksha Trust, Mumbai, P.No. 117.
2) Yalmakar S.N. (1981), "Co-operative Sector in India : A Economi Analyis", Economic and Political Weekly, Vol. IX, No. 1 Sammeksha Trust, Mumbai, P.No. 18.

3) Government of India (1954), "First five Year Plant Report", Publishedby DES, New Delhi, P.No. 07.

4) Sharada Y. (1986), "The Theory of Co-operation", Himalaya Publishing House Bombay, P.No. 4.

5) आळवंडी जी.एन. (1979), "सहकार तत्त्व आणि व्यवहार", राजेंद्र प्रकाशन, मुंबई, पृ. 17

6) शिंदे रा. कृ., कुरकुटे अ.द. (1978), "सहकार तत्वे आणि स्वरुप", राविल प्रकाशन, कोल्हापूर, पृ. 43.

7) चौगुले व्ही.टी., पठाण के.जी. (1979), "सहकाराची मुलतत्त्वे", कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृ. 50.

8) सोडगे व इतर (1991), "सहकार तत्त्व आणि व्यवहार", कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद पृ. क्र. 10.

9) पाटील कायंदे गंगाधर व्ही. (1999), "भारतातील सहकार", चैतन्य पब्लिकेशन, नाशिक, पृ. क्र. 57.

10) तुपे सु.दा. (1992), "सहकाराचे सिद्धांत आणि इतिहास", द्वारका प्रकाशन, पुणे, पृ. 55

11) गायकवाड बी.आर. (संपा.) (2012), "महाराष्ट्राचा आर्थिक विकास : एक चिंतन", चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, पृ. 464.

12) महाराष्ट्र शासन (2009), "महाराष्ट्रातील सहकार चळवळ एक दृष्टिक्षेप", अंक, महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था कार्य, पुणे, पृ. 44.

13) महाराष्ट्र शासन (2012), "जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, सातारा जिल्हा अर्थ व सांख्यिकीय संचालनालय, मुंबई, पृ. 3."

१४) आगलावे प्रदीप, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, प्रकाशन विद्या, नागपूर, २०००, पृष्ठ क्रमांक ११९, १२०

१५) कुंभोजकर ग.वि. संशोधन पद्धती व शास्त्रङ, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८९

१६) कऱ्हाडे बी.एम., सामाजिक संशोधन पद्धती, प्रकाशक-पिंपळापुरे ॲंड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, प्रथमावृत्ती जून २००९, पृष्ठ क्रमांक १४३.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. शाहूराज सुग्रीव मुळे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय,
बाभळगांव, जि. लातूर (महाराष्ट्र)

संशोधक

प्रा. प्रकाश नामदेव शिंदे
अर्थशास्त्र विभाग,
राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय,
औंध, जि. सातारा (महाराष्ट्र)